शोध पत्र-मराठी

# बालकविता आकलनाच्या दिशा

* डॉ. सुनीता सांगोले

August, 2010

* दयानंद कला महाविद्यालय, लातूर

मुलांच्या स्वच्छंदी, निरागस, स्वप्नाळू मनाचा वेध घेणारे साहित्य म्हणजेच बालसाहित्य, प्रौढवयातही स्वतःचे प्रौढपण विसरून बालकांच्या वृत्तीशी तद्रुप होता आले तरच खरे बालसाहित्य आकाराला येईल. त्या प्रयत्नात अनेक वेळा असे पहायला मिळते की, बालसाहित्य म्हणून बालकांसंबंधी लिहिले गेलेले साहित्यच बालसाहित्य म्हणून बालकांवर थोपविले जाते. पण असे साहित्य म्हणजे खरे बालसाहित्य नव्हे! बालकांच्या वृत्तीशी सहमत होऊन त्याच्या आवडी - निवडी, त्यांचे स्वभावविशेष, त्यांचे आकर्षण, त्यांच्या कल्पना, अत्सुकता, कुतुहल यांचा प्रत्यय देणारे साहित्य बालकाला आकर्षित करते. बालकांच्या कल्पनाशक्तीची, जिज्ञासेची, मनोरंजनाची हौस बालसाहित्याने भागविली पाहिजे. त्यादृष्टीने मराठी साहित्य सृष्टीतील बालसाहित्याचे दालन तितके समृद्ध झालेले दिसत नाही. बालवाङ्मयाच्या निर्मितीची जी स्थिती तीच सैद्धांतिक अभ्यासाचीही दिसून येते. बालसाहित्याच्या स्वतंत्र अशा समीक्षेचे दालन अद्यापी उघडले गेले नाही. प्रस्तुत शोध निबंधामध्ये बालकविता आकलनाच्या दिशा स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

**अनुभवविश्व :**

बालसाहित्याचा सर्वात महत्त्वाचा निकष म्हणजे त्यातून प्रकट होणारा अनुभव मोठ्यांची छोटी आवृत्ती म्हणजे मूल असा गैरसमज ब-याचदा पहावयास मिळतो. मुलांचा अणि मोठ्यांचा अनुभव यात फरक आहे. बालकांच्या भावना, विचार, समजूती, श्रद्धा, समस्या सारेच मोठ्या माणसांपेक्षा भिन्न असते. बालकांचे एक चिमुकले जग असते. या जगात आई - बाबा, आजी - आजोबा, मावशी - काका, मामी - मामी, ताई - दादा असे नातेवाईक, चिमणी, कावळा, मोर, बदक, हंस यासारखे पक्षी, बगीचा, निसर्ग, फुले, रंगीबेरंगी फुलपाखरे, शाळा, शिक्षक, शिक्षिका, मित्र - मैत्रिणी आदींनी हे बालविश्व समृद्ध झालेले असते. या विश्वात प्रेम असते, रूसवे - फुगवे असतात, आदर असतो, हेवे - दावे असतात, सुख - दुःख असतात याच्याशी निगडीत बालसाहित्याचे विषय असावेत. मुलांच्या आयुष्यातील अनुभव मोठ्यांच्या आयुष्यातील अनुभवापेक्षा वेगळा असतो. ब-याचदा स्वतःच्या अनुभवात कल्पनेच्या गोष्टींची ते सहज गुंफण करतात. मोठ्यांनी रागवल्यावर बालके रुसतात निसर्गातील वस्तूजात मग प्राणी, पक्षी, झाडे, वेली, फुले - पाने यातही ते अनुभव शोधतात. मुलांची जीवनमूल्येही मोठ्यांहून भिन्न असतात. जसे 'खोटे बोलणे' मोठ्यांच्या दृष्टीने वाईट गोष्ट असते पण मुलांना ख-या - खोट्याच्या सीमारेषा समजत नाहीत. निरनिराळ्या वस्तू, निरनिराळी दृश्ये पाहून मुलांच्या मनात येणारे विचार कधी सरळ तर कधी गुंतागुंतीचे, कधी मजेदार तर कधी विक्षिप्त असतात. त्यांच्या या प्रतिक्रिया आहे तशाच बालसुलभ भाषेतून व्यक्त करणे हा बालसाहित्याचा विशेष होय.

बालगीतांची रचना अतिशय अवघड कला आहे. स्वतः प्रौढ असताना बालभावनेशी समरस होऊन त्याला ही रचना करावी लागते. बालकविता कोणी व कशाविषयी लिहिली यापेक्षा ती कविता मुलांच्या आंतरिक जीवनाशी कितपत संवाद साधते? यावर बालकवितेचे मूल्यमापन व्हावे.

**कल्पकता :**

मुलांना स्वप्नसदृश्य कल्पनाशक्तीचे फार मोठे वरदान असते. या कल्पनाशक्तीचे काही विशेष बालसाहित्यातील प्रतिभासृष्टीला आत्मसात करावे लागतात. या कल्पनाविलासात वास्तव - अवास्तव यातील सीमारेषा पुसली जाते. कल्पनेची भरारी मारून कवी या बालमित्रांना एका वेगळ्या विश्वात घेऊन जातो. या विश्वात काहीही घडू शकते. जसे - प्राणी, पक्षी बोलतात; आकाशात उडता येते; एखादे राज्य आनंदाचे हसण्याचे असते. या कल्पनाविश्वात भूत, राक्षस, देव अशा सगळ्याच गोष्टींना रूप लाभते. सचेतनाचे चेतनीकरण, मानवीकरण करण्याकडे या बालमानसाचा कल असतो. म्हणूनच

**"म्हणे एका गावात, पंख आहेत मुलांना**
**उडत उडत जाऊन, शिवून येतात ढगांना"**
**- राजा मंगळवेढेकर**

या कल्पनेत मुले रमतात. सत्यासत्यतेचा पडताळा पाहण्यापेक्षा मुलांना त्यातली गंमतच जास्त आवडते. या कल्पनाशक्तीच्या आधारे एक अशक्य अतर्क असे जग उभे करता येते. विंदा करंदीकरांनी आपल्या बालकवितेतून जे अद्‌भूत जग निर्माण केले त्यामुळे या बालगीतांची बालप्रियता मोठ्या प्रमाणावर दिसून येते. बालकांच्या कल्पनाही अफलातून असतात. बालकविता लिहिणा-या कवीला या कल्पनेशी समरस व्हावे लागते. अफलातून कल्पकतेचा एक नमुना म्हणून सांगता येईल - 'आपल्याला कोण व्हायचे?' या बाबतीतील मुलांच्या कल्पना उल्लेखनीय आहेत. कधी त्यांना घरातील आई, वडील, भाऊ - बहीण व्हावे वाटते. कधी शिक्षक व्हावे वाटते. कधी दुकानदार तर कधी मोटार ड्रायव्हर व्हावे वाटते. कधी त्यांना काय व्हावेसे वाटेल काहीच सांगता येत नाही. याचे कारण त्या त्या क्षेत्रातील व्यक्तींचा

अधिकार त्यांना आकर्षीत करीत असतो. जसे ड्रायव्हर व्हावे वाटते कारण ड्रायव्हरला वाटेल तेव्हा वाटेल तेथे जाता येते. त्याच्या कल्पना नेहमीच बदलतात याचे भान बालकविता निर्मितीच्या वेळी ध्यानात घ्यावे लागते.

कल्पकतेचा आणखी एक वेगळा पैलू आजच्या बालकवितेत शोधता येतो तो वैचित्र्याचा. कल्पना वैचित्र्याचे विविध नमुने बालकवितेत आढळतात. या कवितेतून आलेल्या उपमा सांकेतिक ठराविक नाहीत. त्यामुळे त्यांना चमत्कृतीला वेगळे रुप लाभलेले दिसते.

**उदा. "असावा सुंदर चॉकलेटचा बंगला**
**चंदेरी सोनेरी चमचमता चांगला**
**चॉकलेटच्या बंगल्याला टॉफीच दार**
**शेपटीच्या झुपक्यांन झाडून जाईल खार"**

**बाळाच्या घराचे हे वर्णन अतिशयोक्तीपूर्ण**, चमत्कृतीजन्य आहे पण म्हणताना बालकाच्या ओठावर स्मित खेळेलं. इंग्रजी वाङ्‌मयात 'नॉन्सेन्स -हाईम्स' नावाचा एक बालकविता प्रकार फार प्रचलित आहे. असंबद्ध गोष्टींची काव्यजुळवणी हे त्याचे प्रमुख लक्षण. हल्लीच्या बालकवितेतून येणा-या चमत्कृतीजन्य कल्पना याला जवळ जाणा-या आहेत. या कवितेत घटकांचा अर्थकारणभाव शोधू नये किंवा सत्यासत्यतेचा निकष लावू नये हे गीत गाताना बालकांना गम्मत वाटते हीच त्याची सार्थकता! बालकांना अशी गम्मत जम्मत आवडते.

**अतार्किकता :**

कल्पकतेला जोडूनच येणारे हे एक वैशिष्ट्य. बौद्धीक तर्कपरंपरा मोडून अवास्तव गोष्टींची वास्तवाप्रमाणे हेतूपूर्वक मांडणी करून एक वेगळीच कल्पित सृष्टी निर्माण करणे याला 'अतार्किकता' म्हणतात. बालसाहित्यातून अशा अतार्किक, असंभाव्य गोष्टीही येतात. बालकथांतून ही अतार्किकता प्रामुख्याने येत असली तरी बालकवितेतूनही अस एक प्रवाह आढळतो.

**उदा. "चुलीवरची खीर एकदा पुरीला हसली"** या निर्मला देशपांडे यांच्या कवितेत खीरीने पुरीला हसणे, पुरीने टम्म फुग्गणे पुढे पुढे ही कल्पना अतार्किकतेकडे जाऊ लागते. या अतार्किकतेमध्ये एक आंतरिक सुसंगती असते. विशेषतः छोट्या मुलांसाठी जी साहित्यनिर्मिती केली जाते त्यात अतार्किकता महत्त्वाची असते. राणीचा बाग! या करंदीकरांच्या कवितेत राणीच्या बागेत पत्ते खेळणारे हरीण - चित्ते; दुकानदार - कोल्हा; व्याख्यान देणारा - सिंह..... या अतार्किक गोष्टीत बालके इतकी रममाण होऊन जातात मग हरीण चित्यांची अशी मैत्री शक्य आहे का? अशा विचाराकडे जराही न जाता ते या कल्पनेच्या विश्वाच्या आनंदात रममाण होतात.

**जिज्ञासापूर्तीः**

मुळात बालकांची वृत्ती जिज्ञासू असते. वय जसजसे वाढत जाते तसतसा त्याचा या विश्वाशी परिचय वाढत जातो. पहिल्यांदा आई - वडील घरातील इतर लोक, घरातील वस्तू त्यांच्या परिचयाच्या होतात. पुढे क्रमाने अंगण, अंगणात येणारी गाय, काऊ - चिऊ, शेजा-यांची मुले क्रमाने व टप्याटप्याने त्याचे हे ज्ञान वाढत जाते. तसतशी जिज्ञासाही वाढत जाते. विश्वातील प्रत्येक गोष्टीविषयी, घटनेविषयी, त्याच्या मनात कुतहूल असते. जसे पाऊस का पडतो? दिवस - रात्र का? एक ना अनेक प्रश्न त्याच्या मनात येत असतात. अशा जिज्ञासेची तृप्ती काही कल्पनातून होते, जसे-

**"चांदोमामा चांदोमामा गोरा तुझा रंग**
**चांदण्याच्या दुधाने का धुतोस अंग"- शांता शेळके**
**किंवा**
**"आभाळाची चादर एकदा मळली होती खूप**
**धुरकट, तेलकट, ढगाळलेले अस तिचं रूप**
**पाऊसमामा लगबग आले आले धावून**
**आभाळाची चादर त्यांनी लख्ख काढली धुवून"**
**- निर्मला देशपांडे**

लहान मुले जगाकडे अत्यंत जिज्ञासेने पहात असते. वा-याने पडणारे झाडाचे पान, झाडावर उमलणा-या कळ्या, वाहनाचे वेगाने धावणे, पक्ष्यांचे आकाशात उडणे अशा गोष्टींचे निरीक्षण ते करू लागतात. मुलांच्या मनातील या जिज्ञासेपोटी येणारे प्रश्न थेट, स्वच्छ, निर्भिड, मुक्त असतात. अशा मुलांच्या प्रश्नांना कल्पना शक्तीच्या आधाराने दिलेली उत्तरे यातूनही बालगीतांचा जन्म होतो. अशी बालगीते स्वाभाविकच मनाला आकर्षित करतात.

**ज्ञानसंवर्धन व संस्कार :**

बालवाङ्‌मयाच्या अगदी प्रारंभीच्या काळात जी बालवाङ्‌मयाची निर्मिती झाली. तिकडे पाहता केवळ संस्कारासाठी बोधपर बालवाङ्‌मयाची निर्मिती असे चित्र दिसते. मुलांच्या स्वाभाविक गुणांनी वाढ करणा-या सत्य, अहिंसा, मानवता अशा मूल्यांची शिकवण देणारे संदर्भ बालसाहित्यातून यावेत. आपल्या देशाची संस्कृती, परंपरा, इतिहास यांचेही संदर्भ बालसाहित्यातून यावेत. मुलांचे मनोरंजन करता करता त्यांना शिकवणे हा हेतू बालसाहित्य लिहीणा-याने ठेवावा. मुलांना आयुष्य केवळ उपभोगायचे नसते तर शोधायचे असते. स्वतःचा शोध घ्यायचा असतो, स्वतःला घडवायचे असते. त्यासाठी मुलांची शारिरीक, मानसिक वाढ योग्य रितीने व्हावी यासाठी चांगल्या साहित्याची व ती लिहीणा-या चांगल्या साहित्यीकांची गरज आहे.

**"इंद्रधनुष्य नेहमी ओणवे का हो असते?**
**ते की नाही, आपला आठवा रंग शोधीत असते."**
**- सदानंद रेगे**

या कवितेत इंद्रधनुष्याचे सात रंग कळतात. असेच वारांचेही गाणे आहे. ल. म. कडू यांनी निर्सगाच्या उत्पत्तीक्रमावर 'झाड' पुस्तक लिहीले यात झाड कसे मोठे होते याची माहिती मिळते. अशा बालकवितांतून पशु, पक्षी, प्राणी, मानव निसर्गातील बदल, घडामोडी अशा कितीतरी गोष्टींचे ज्ञान बालकाला होते. मानवता, समानता, कारुण्य जगाविषयी आस्था, निसर्ग प्रेम अशा अनेक मूल्यांचा खोलवर संस्कार बालसाहित्याच्या माध्यमातून होऊ शकतो. मुलांच्या मनावर भोवतालच्या जगाचे ठसे उमटत असतात. ज्यात नैसर्गिक तसेच मानवाने निर्माण केलेल्या वस्तूंचा समावेश असतो. बालगाण्यात सहजपणे मुले रमतात.

तेव्हा त्या माध्यमातून खाटे बालू नये, दयाभाव धारण करावा, कुसंगती टाळावी.. असा अनेक गुणांचा संस्कार घडेल. पण म्हणून काही निव्वळ बोधपर लिहीणे म्हणजे बालसाहित्य नव्हे! निव्वळ नितीनियमांचा प्रौढांना सुद्धा कंटाळा येतो तेव्हा बालकांना ही तो येणे स्वाभाविकच आहे. म्हणून केवळ संस्कार करण्याच्या उद्देशातून बालवाङ्मयाची निर्मिती केली जाऊ नये. पण अप्रत्यक्षपणे बालसाहित्यातून बालवाचकाच्या मनावर एखादा चांगला संस्कार व्हावा. हळूवारपणे साहित्याच्या माध्यमातून मुलांचे ज्ञानसंवर्धन व्हावे, मुलांवर सभ्यतेचे संस्कार व्हावेत. पण हेतू पुरस्सर बालवाङ्मयावर संस्काराचे ओझे लादू नये.

**रंजकता :**

साहित्य मग ते बालसाहित्य असो की मोठ्यांचे प्रथम ते साहित्य असते. साहित्याचे मुख्य प्रयोजन 'आनंद' होय. म्हणूनच बालसाहित्याचे स्वरुप मनोरंजक आनंददायी असावे. उत्तम साहित्याचे जे जे निकष ते सर्वच बालवाङ्मयानेही पाळले पाहिजेत. मुले रंजकतेकडे जास्त ओढली जातात म्हणून त्यांच्या गीतात रंजकता हवीच. कारण काव्याचा हेतू मनोरंजन करणे हाच आहे. मुलांच्या भूमिकेतून विविध विषय असलेली, नादमयता असलेली, पंचेंद्रियांना आव्हान करणारी, अभिनय प्रधान असलेली कविता मुलांना आवडते.

**नादमयता :**

लयबद्ध कविता म्हणजे संगीत व कल्पना यांचा सुंदर मिलाफ होय. बालगीतांचे वैविध्यपूर्ण विषय तर बालमनाला आकर्षित करतात. मुलांच्या मनात ताल, लय, आघातयुक्त ध्वनी, बोलभाषा यांचे आकर्षण असते.

**उदा. गाडी आली गाडी आली झुक् झुक् झुक्**
**शिटी कशी वाजते बघा कुक् कुक् कुक्**
**इंजिनाचा धुर निघे भक् भक् भक्**
**चाके पाहू तपासून ठक् ठक् ठक्**

सोपे शब्द, पुर्नउच्चार, तालबद्ध रचना, नादमाधुर्य, गेयता या गुणांनी युक्त असे शिशुगीत बालकाला आकर्षित करते. मुलांना लयी बरोबर ध्वनींचेही आकर्षण असते. कधी कधी निरर्थक ध्वनीसुद्धा मुलांना अर्थपूर्ण ध्वनीपेक्षा आनंद देतात. लयीमुळे मुलांना गाणे पाठ तर होतेच. पण लयीच्या प्रभावाने तो हातपाय हालवतो. अभिनय करु लागतो. मुलांना क्रियाशील खेळांमध्ये आनंद वाटतो. अभिनय करीत गाणे गाण्यात त्यांना मौज वाटते. ते पटकन गाण्याशी एकरुप होतात. वा. गो. मायदेव यांच्या अभियन गीतांनी एकेकाळी बालकांना वेड लावले होते. तालबद्धतेचे उत्तम उदाहरण म्हणून पुढील ओळी पहा

**"ठण् ठण् ठण्"**
**ठण् ठण् ठण  सकाळ झाली रे राजन्**
**ठण् ठण् ठण्   ऊठ तोंड धू रे पटकन**
**ठण् ठण् ठण्   दिलीप माया ए शालन**

हे गोपिनाथ तळवलकरांचे बालगीत सर्वस्वी तालातच रमणारे आहे. बालगीताची रचना करताना मुलांचा कल लक्षात घेऊन केलेली रचना असावी. बालगीतात चिमणी नुसती उडत नाही ती भुर्रकन उडते, घोडा टप् टप् टापा टाकीत चालतो, घंटा घण् घण् वाजते, पाऊस धो - धो कोसळतो, पक्षी किलबिलतात या ध्वनींच्यामुळे गाण्याला ताल मिळतो. ठेका मिळतो या ठेक्यावरच मुले नाचू लागतात. लयबद्ध कविता आत्मसात करण्याकडे मुलांचा कल असतो. म्हणूनच बालगीतात सोपे शब्द, पुनरुक्त, तालबद्ध रचना, कृतिप्रवणता व नादमाधुर्य अशा गुणसामुग्रीने ते युक्त असावेत.

**विनोद :**

मुलांना हसायला छोटेसे कारणही पुरते. एखाद्याच्या मोठ्या वक्राकार मिशा त्यांच्या चेह-यावर हसू फुलवतात. हसण्याचे कारण ठरते कधी कधी घसरून पडणे, कोणाची फजीती होणे अशा प्रसंगांना बालमित्रांना हसू फुटते. हे बालमानस ओळखून मुलांची विनोद प्रियता लक्षात घेऊन बालसाहित्यातून विनोद पेरणे रंजक ठरु शकते.

**उदा.  जाड्या - रड्या दुक्कल छान**
**होती मोठी अक्कलवान**

किंवा 'शिंप्यांच्या दुकानात' या कवितेतील या ओळी पहा.

**"हत्ती गेला हलवित पोट**
**म्हणाला, माझा बेता कोट**
**जेव्हा त्याचा मोजला घेरा,**
**मोज पट्ट्या लागल्या तेरा"**

जस जसे वय वाढत जाते तस तसे या विनोदाचे स्वरुपही बदलत जाते. सुरुवातील फसकन हसू करणारा विनोद हळू हळू या विनोदात बौद्धिकता, मिस्कीलपणा आणि सूचकता येत जाते. या विनोदाची उकल मुलांना आनंद देऊन जाते.

**भाषा :**

बालकाची भाषिक क्षमता ओळखून बालवाङ्मयाचे लेखन करावे. बालवाङ्मयाची भाषा ही 'वाच्यार्थ' प्रकट करणारी असावी. कारण 'लक्षार्थ' किंवा 'व्यंगार्थ' बालके समजून घेऊ शकतीलच असे नाही. या भाषेचा सगळ्यात महत्त्वाचा गुण म्हणजे श्रवणरम्यता. बालवाङ्मय श्रवणरम्य असावेच कारण बालकांना गोष्ट किंवा कविता ऐकणेच आवडते. लहान मुले प्रत्येक गोष्टींचा अनुभव उत्कटतेने घेतात. आनंद, दुःख, निराशा, भिती काहीही ते लपवून ठेवत नाहीत. वाचून, उड्यामारुन, रडून, भोकाड पसरुन प्रसंगी हातपाय आपटणे, टाळ्या वाजवणे अशा शारिरीक कृति करुन ते आपल्या भावना प्रकट करत असतात. तेव्हा बालसाहित्यीकाने या वृत्तीची उत्कट अभिव्यक्ती व्हावी अशी भाषा वापरावी. सहज - स्वाभाविक, घटना प्रसंगांचा परीपोष करणारी भाषाशैली असावी. बालकवितेत काही शब्द किंवा वाक्यांची पुनरावृत्ती करुन ताल साधलेला असावा. बालकवितेची भाषा रंग, रुप, गंध या इंद्रिय संवेदना जागे करणारी असावी. जसे गुलाबाचा रंग लाल चुटुक होता, कावळा कसा काळा कुट्ट, पुरी कशी टम्म फुगली, बगीच्यातली हिरवळ मखमली सारखी मऊ, फुलांचा गंध कसा प्रुफुल्ल करणारा अशी वर्णने बालवाङ्मयात आवश्यक आहेत. बालकांना नादमाधुर्या बरोबर लालीत्य हवे.

त्याबरोबर चटकदारपणा ही याचा परीपोष करणारी भाषा बालवाङ्मयाने अवलंबवावी.

**चित्रे व पुस्तकांचे बहिरंग :** आतापर्यंतच्या विवेचनात बालकवितेचे अंतरंग कसे असावे त्याचे निकष आपण पहिले. या अंतरंगाबरोबरच बाह्यरूपाचाही विचार करणे उचित ठरते. बालकाव्याला चित्रांनी नवी शोभा येते. बालकवितेत आशय जसा बालसुलभ व परिणामी चांगला ठरणारा हवा तसेच काव्यानुरूप चित्रे पाहिजे, हे स्पष्टच आहे. ही चित्रे आशयाशी सुसंगत किंबहूना उत्कट अभिव्यक्ती करण्याच्या दृष्टीने उपयुक्त हवीत. उत्कृष्ट चित्र, सुंदर रंगसंगती आणि सौष्ठवपूर्ण मुद्रण यांच्यामुळे विशिष्ट वयातील मुलांच्या मनाची ती एकदम पकड घेतात. वि. दा. करंदीकर, पाडगांवकर, माडगुळकर, रेगे, पत्की, लिमये अशा बालसाहित्यकारांची बालकवितांची पुस्तके दलाल, सरवटे, शाम जोशी, पद्मा गोरे या चित्रकारांनी कमालीच्या कल्पक आकर्षक चित्रांनी सजवली आहेत. मौज, पॉप्युलर, साधना या प्रकाशनांनी मुखपृष्ठ, टाईप अशी सर्वांगसुंदर बालकवितांची पुस्तके प्रकाशित केली.

**समारोप व निष्कर्ष :** आज बालकावर संस्कार झाले पाहिजेत, बालकांचा विकास व्हावा. त्यांची आवड - निवड जाणून घ्यावी. त्यांचे ज्ञान अद्यावत, चौफेर व्हावे या दृष्टीने पालक विचार करू लागले आहेत. त्या अनुषंगाने बालसाहित्य हा विषय जिव्हाळ्याचा, चर्चेचा बनु लागला आहे. बालसाहित्याचा विकास होण्याच्या दृष्टीने सध्याचे हे चित्र निश्चितच अशादायी आहे. या पार्श्वभूमीवर बालसाहित्याचा परिघ रुंदावा यासाठी बालसाहित्याचा प्रसार व त्यावर समीक्षा होण्याचा आग्रह धरला पाहिजे. बालसाहित्याची समीक्षा समृद्ध व्हावी या दृष्टीने बालसाहित्यातील एक भाग बालकविता तिच्या आकलनाच्या दिशा स्पष्ट करण्याचा हा नम्र प्रयत्न! १) मुलांच्या अनुभवविश्वांशी संवादी बालकविता असावी. २) बालकवितेतून मुलांच्या कल्पनांशी सुसंगती साधली गेली पाहिजे. ३) ज्ञानवर्धन व संस्कारासाठी सत्य, अहिंसा, मानवता अशी मूल्य शिकवण देणारे तसेच आपल्या देशातील संस्कृती, परंपरा, इतिहास सांगणारे संदर्भ बालसाहित्यातून सहजपणाने यावेत. ४) नादमयता हा बालकवितेचा एक प्रमुख विशेष होय. ५) बालकवितेची भाषा सोपी, गेय, नादमधुर, श्रवणरम्य असावी. ६) बालकवितेच्या पुस्तकावरील तसेच आतील चित्रे मुलांना पुस्तकाकडे खेचून घेण्यास मदत करतात.

**संदर्भ ग्रंथ**

अर्वाचीन मराठी काव्यदर्शन - डॉ. अक्षयकुमार काळे परंपरा आणि नवता - गो. वि. करंदिकर बालवाङ्मय - देविदास बागुल बालसाहित्याची रुपरेखा - मालती दांडेकर मराठी बालसाहित्य : प्रवाह आणि स्वरुप - डॉ. सुलभा शाह